Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६। वर्ष १ ।अंक ३ ।पाने २।

DIGITAL EDITION




'काम नाही तर पद नाही': शिंदे (पान २ वर)

Selected

## लखनौ जायंट्सचा कोलकातावर विजय

मुंबई। आयपीएल २०२६ स्पर्धेतील १९ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. कोलकात्यातील इडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने पहिल्या डावात फलंदाजी करताना २० षटकांअखेर ४ गडी बाद १८१ धावा केल्या होत्या. या धावांचा बचाव करताना कोलकाता नाईट रायडर्स संघातील गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी केली. पण शेवटी लखनौच्या मुकुल चौधरीने सामना फिरवला. मुकुलने अर्धशतकी खेळी करून लखनौला ३ गडी राखून विजय मिळवून दिला. कोलकाता नाईट रायडर्सने लखनौसमोर विजयासाठी १८२ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना लखनौ सुपर जायंट्स संघाला हवी तितकी वेगवान सुरुवात मिळाली नाही. मिचेल मार्श आणि एडेन मारक्रमच्या जोडीने पहिल्या विकेटसाठी ४१ धावा जोडल्या. एडेन मारक्रम २२ धावा करून माघारी परतला. पण तो अवघ्या १० धावा करून माघारी परतला. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेल्या आयुष बदोनीने ५४ धावांची महत्वपूर्ण खेळी केली.

## इराणच्या नव्या अटींमुळे जगाचे टेन्शन वाढले

# अमेरिका - इराण युद्धला विराम!

## 'होर्मुझ' अद्याप बंदच? दिवसाला फक्त १५ जहाजांना परवानगी

जन सम्राट टाईम्स

मुंबई : अमेरिका आणि इराणमध्यु युद्धविराम होऊन देखील होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक सुरळीत झाल्याचे चित्र नाही. युद्धविरामानंतरही होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक जवळजवळ ठप्प होती. दररोज १५ पेक्षा जास्त जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी देणार नसल्याचे इराणच्या मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे तर, जहाजांना सामुद्रधुनी ओलांडण्यासाठी लष्कराची परवानगी घ्यावी लागणार आहे. यामुळे ज्या अटीवर युद्धविराम झाला ती होर्मुझ सामुद्रधुनी खरचं खुली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दिवसाला केवळ १५ जहाजांना परवानगी रॉयटर्स या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, 'युद्धविराम झाल्यानंतर गेल्या २४




### दोन्ही देश मांडणार बाजू

पाकिस्तानमध्ये अमेरिका आणि इराणमध्ये होणाऱ्या चर्चेत दोन्ही देशातील संघर्षावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, इराण होर्मुझ सामुद्रधुनीचे नियंत्रण आणि तिथं शुल्क आकारणी सुरु करण्यासाठी वाटाघाटी करण्याच्या तयारी आहे. दुसरीकडे अमेरिका होर्मुझ पूर्णपणे खुली करण्याची मागणी करत आहे. शिवाय युरेनियमचे संवर्धन थांबवणे आणि इराण अण्वस्त्र निर्माण करणार नाही याची हमी अमेरिकेला हवी आहे.

तासांत एक तेलाचे जहाज, पाच ड्राय बल्क कॅरिअर गुरुवारी होर्मुझमधून बाहेर पडले आहेत. दोन इराणी टँकर देखील सामुद्रधुनीतून बाहेर आले', असे रॉयटर्सने म्हटले आहे. दरम्यान, इराण केवळ १५ जहाजांनाच होर्मुझमधू बाहेर पडण्याची परवानगी देत आहे, असे वृत्त रशियाच्या टास (TASS) या वृत्तसंस्थेने इराणी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने प्रसिद्ध केले आहे. अबू धाबी नॅशनल ऑइल कॉर्पोरेशनच्या प्रमुख सुलतान अल जाबेर यांनी ब्लूमबर्गशी बोलताना इराणने दिलेली सशर्त मंजुरी खऱ्या अर्थाने मंजुरी म्हणता येत नाही, असे मत नोंदवले आहे. इराणचे उप परराष्ट्र मंत्री, सईद खतीबजादेह यांनी होर्मुझ सामुद्रधुनीबाबत माहिती दिली आहे. होर्मुझ खुली असली तरी, प्रत्येक टँकर आणि जहाजाला सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार करण्यासाठी इराणी लष्कर आणि अधिकाऱ्यांकडून आवश्यक परवानगी घेणे गरजेचे आहे, असे खतीबजादेह म्हणाले. "संघर्ष सुरु असल्यामुळे काही तांत्रिक मर्यादा लागू करण्यात आल्याने सध्या सामुद्रधुनीचा मार्ग अरुंद झाला आहे, त्यामुळे अधिक काळजी घेण्याची गरज आहे", असे खतीबजादेह यांनी एका वृत्तसंस्थेला माहिती देताना सांगितले. मंत्र्याच्या या वक्तव्यामुळे सामुद्रधुनी पार करण्यासाठी परवानगी गरजेची असल्याचे समोर आले आहे.

### पाकिस्तानमध्ये होणार चर्चा

अमेरिका आणि इराणमध्ये झालेल्या युद्धविरामात होर्मुझ सामुद्रधुनीचा मुद्दा अत्यंत महत्वाचा होता. दोन्ही देशांनी याबाबत अटी ठेवल्याचे समोर आले. इराणने अमेरिकेसमोर ठेवलेल्या १० मुद्यांच्या प्रस्तावात होर्मुझवर टोल आकारण्याची मुभा आणि संपूर्ण नियंत्रणाचा उल्लेख आहे. तर, अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षित आणि पूर्ण खुली करण्याच्या अटीवर शस्त्रसंधीचा प्रस्ताव मान्य केला, असे स्पष्ट केले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानमध्ये शांतात प्रस्तावावर चर्चा होणार आहे.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

## राहुरीत 'वंचित विरुद्ध भाजप'ची थेट लढत?

### प्रकाश आंबेडकरांचा घणाघात

जन सम्राट टाईम्स



**अहिल्यानगर :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून वंचित बहुजन आघाडीचे नेते PRAKASH AMBEDKAR यांनी आज प्रचारसभेतून विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. "ही लढत थेट वंचित आणि भाजप यांच्यातच आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार हा केवळ डमी आहे," असा थेट आरोप करत त्यांनी निवडणुकीचा रंग अधिकच चढवला. प्रचारसभेत बोलताना आंबेडकर यांनी SHARAD PAWAR यांच्यावर निशाणा साधत "प्राजक्ता तनपुरे यांना उमेदवारी न देण्याचा निर्णय हा त्यांच्या पक्षांतर्गत आहे. भाजपने दबाव आणला, हा केवळ दिशाभूल करणारा प्रचार आहे," असे स्पष्ट केले. याशिवाय त्यांनी यांच्या विमान अपघात प्रकरणावरूनही सवाल उपस्थित करत "या प्रकरणात साधी एफआयआरही दाखल झाली नाही, यात काहीतरी काळेबेरे आहे का?" असा प्रश्न उपस्थित केला.

घराणेशाहीवर जोरदार टीका आंबेडकर यांनी आपल्या भाषणात घराणेशाहीवर कडाडून टीका केली. "घराणेशाही वाढली तर लोकशाही संपते आणि हुकूमशाहीची सुरुवात होते," असा इशारा देत त्यांनी मतदारांना सजग राहण्याचे आवाहन केले. तसेच मुस्लिम समाजाला उद्देशून त्यांनी 100 टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. "मतदानाचा हक्क प्रभावीपणे वापरला खरात प्रकरणावरून विखे पाटलांना आव्हान अशोक खरात प्रकरणाचा उल्लेख करत आंबेडकर यांनी भाजप आणि पालकमंत्री यांच्यावर गंभीर आरोप केले. "अंधश्रद्धेच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे," असे ठणकावत त्यांनी खरात प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

## नातेवाईकांनाही नाही सोडलं! भोंदूबाबा अशोक खरात च्या काळ्या कृत्यांचा धक्कादायक भांडाफोड

जन सम्राट टाईम्स

नाशिक : राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता धक्कादायक माहिती समोर येत आहे. खरातच्या काळ्या कृत्यांचा इतिहास तब्बल ४९ वर्षांपूर्वीपासून सुरू असल्याचे उघड झाले असून, त्याने नातेवाईकांनाही सोडले नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खरातने वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी म्हणजे १९८० च्या सुमारास आपल्या गुन्हेगारी कृत्यांची सुरुवात केली. त्याच्याच नात्यातील एका महिलेला मूल होत नसल्याच्या समस्येचा फायदा घेत, भोंदूगिरीच्या नावाखाली तिला



जाळ्यात ओढून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. ही बाब उघडकीस आल्यानंतर पोलिस कारवाईच्या भीतीने खरातने गावातून पलायन केले होते. त्यानंतर तब्बल १५ वर्षे तो नेमका कुठे होता, याचा ठावठिकाणा अद्याप समोर आलेला नाही. या काळातही त्याने अशाच प्रकारे इतर महिलांची फसवणूक केली का, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. गुन्ह्यांची मालिका वाढतच चालली दरम्यान, सध्या उघडकीस आलेल्या प्रकरणांनुसार खरातविरुद्ध महिला अत्याचाराचे आठ गुन्हे नोंद असून, त्याशिवाय खंडणी, खासगी सावकारी आणि फसवणुकीचे पाच गुन्हेही दाखल आहेत. त्यामुळे त्याच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत. दुसऱ्या गुन्ह्यातील पोलिस कोठडी संपल्यानंतर खरातला नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. मुख्य न्यायदंडाधिकारी बी. एन. इचपुराणी यांनी त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. यानंतर तिसऱ्या गुन्ह्यात गुरुवारी पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्याला १३ एप्रिलपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## जळगावात धक्कादायक वास्तव; कागदपत्रांच्या अभावी हजारो भिल्ल समाजातील बालके शिक्षणापासून वंचित

### आधार, जन्मदाखला नसल्याने शाळाबाह्य मुलांची संख्या वाढली

जन सम्राट टाईम्स

जळगाव : जळगाव जिल्ह्यातील आदिवासी भिल्ल समाजाच्या वस्त्यांवर अत्यंत गंभीर आणि चिंताजनक परिस्थिती समोर आली आहे. आधार कार्ड, जन्म दाखला, जात प्रमाणपत्र यांसारख्या आवश्यक कागदपत्रांच्या अभावी हजारो बालके शिक्षणापासून वंचित राहत असून महिला आणि पुरुष आरोग्य योजनांच्या लाभापासूनही दूर आहेत. आदिवासी टायगर सेनेचे राज्य प्रवक्ता Pandharinath More यांनी या संदर्भात गंभीर मुद्दा उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, भिल्ल समाजातील कुटुंबे अत्यंत गरीब असून उदरनिर्वाहासाठी वीटभट्ट्या, ऊसतोड आणि इतर मजुरीसाठी दरवर्षी ४ ते ६ महिने स्थलांतर करतात. या सततच्या स्थलांतरामुळे अनेक मुलांची जन्मनोंदच होत नाही.कागदपत्रांअभावी शिक्षणाचा हक्क हिरावला जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड



किंवा जात प्रमाणपत्र नसल्यामुळे या मुलांना शाळेत प्रवेश मिळत नाही. परिणामी, अनेक बालके अंगणवाडीपुरतीच मर्यादित राहतात किंवा पूर्णपणे शिक्षणाबाहेर पडतात. शिक्षणाचा मूलभूत हक्क कागदपत्रांच्या अडचणीमुळे नाकारला जात असल्याचे वास्तव समोर येत आहे. महिलांनाही आरोग्य सुविधांचा अभाव महिलांना प्रसूतीच्या काळात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. आवश्यक कागदपत्रे नसल्यामुळे त्यांना सरकारी रुग्णालये व विविध आरोग्य योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यूचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. बालमजुरी आणि सामाजिक समस्या वाढल्या शिक्षणाच्या अभावामुळे अनेक मुले बालमजुरी, भिक्षा मागणे आणि इतर सामाजिक समस्यांमध्ये अडकत आहेत. यामुळे समाजावर "गुन्हेगारीचा ठप्पा" कायम राहत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. "नको फासे, नको जाळे; लेकीला पाठवू आता शाळे" अशा घोषणा दिल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## मुंबई विमानतळाच्या टर्मिनल-1 मध्ये भीषण आग

### सुदैवाने जीवितहानी नाही, तपास सुरू



जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील टर्मिनल-1 बी मध्ये गुरुवारी संध्याकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली. विलेपार्ले येथील या टर्मिनलमधील प्रवाशांच्या बसण्याच्या जागेजवळ सुमारे सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याने विमानतळ परिसरात एकच खळबळ उडाली. आगीमुळे मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. केबल ट्रे आणि स्विच बॉक्समध्ये आग मुंबई अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी रवींद्र अंबुलगेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही आग टर्मिनलच्या आतील केबल ट्रे आणि स्विच बॉक्समध्ये लागली होती.

आगीचे स्वरूप पाहता ती तळमजल्यापुरतीच मर्यादित राहिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, मुंबई पोलीस आणि महापालिका प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सुरक्षा यंत्रणा तत्काळ सतर्क करण्यात आली होती. जीवितहानी टळली; कारण अस्पष्ट

### सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल

तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल या घटनेचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून त्यात टर्मिनलमधून बाहेर पडणारा काळा धूर स्पष्ट दिसत आहे. धुरामुळे काही काळ प्रवाशांची ये-जा रोखण्यात आली होती.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, काही काळासाठी संबंधित भागातील हालचाल आणि प्रवेश मर्यादित करण्यात आला होता. सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून विमानतळाचे कामकाज हळूहळू सुरळीत होत आहे.

## शिंदेंवरील गाणे 'व्यवसायाचा भाग'; विशेषाधिकार समितीसमोर कुणाल कामराचे स्पष्टीकरण

जन सम्राट टाईम्स

मुंबई : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबनपर 'ठाणे की रीक्षा' या गाण्यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी विधिमंडळाच्या विशेषाधिकार समितीसमोर आपली भूमिका स्पष्ट केली. हे गाणे आपल्या व्यवसायाचा भाग असून त्यामध्ये कोणतीही चूक नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. विशेषाधिकार समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सुनावणीत कामरा यांची साक्ष नोंदविण्यात आली. या बैठकीत हक्कभंग प्रस्ताव मांडणारे आमदार प्रवीण दरेकर यांचीदेखील साक्ष घेण्यात आली. सुनावणीदरम्यान कामरा यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन करत सांगितले की, "व्यंग आणि विनोद मांडणे हा माझा व्यवसाय आहे. त्या अनुषंगाने तयार केलेल्या गाण्यातून समाजातील घडामोडींवर भाष्य केले आहे. त्यामुळे यात चुकीचे काहीही नाही." बैठकीत मराठीतून मांडण्यात येणारे मुद्दे समजण्यासाठी कामरा यांनी भाषांतरकाराची मदत



घेतली. भाषांतरकाराने प्रत्येक मुद्दा समजावून सांगितल्यानंतरच कामरा यांनी समितीसमोर आपले उत्तर दिले. माफीबाबत स्पष्ट भूमिका नाही सुनावणीदरम्यान कामरा यांना बिनशर्त माफी मागण्याबाबत विचारण्यात आले असता त्यांनी तात्काळ निर्णय न देता, यावर आपल्या वकिलामार्फत उत्तर देणार असल्याचे सांगितले. त्यामुळे माफी मागण्याबाबतची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांनी सुनावणीनंतर माहिती देताना सांगितले की, पुढील निर्णय घेण्यापूर्वी कामरा यांच्याकडून काही अतिरिक्त कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. त्यानंतरच या प्रकरणावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. या प्रकरणामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा रंगली असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मर्यादा यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## राज्यात २५ लाख टन कांद्यावर होणार प्रक्रिया

जन सम्राट टाईम्स

मुंबई : गत दोन वर्षांत कांदा दरात झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना सुमारे १४०० कोटी रुपयांची मदत करण्यात आली. पण, दरातील चढ – उतार दरवर्षीचा प्रश्न आहे. त्यामुळे दरवर्षी किमान २५ लाख टन कांद्यावर प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सुमारे ८०० कोटी रुपयांची गरज लागेल, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावळ यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे एस – ४- एस टेक्नॉलॉजीजच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत मंत्री रावळ यांनी कांदा प्रक्रिया व साठवणुकीच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्कआणि मे. एस -४- एस टेक्नॉलॉजीजचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कांदा दरातील चढ -उतारांपासून संरक्षण मिळून स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याची गरज आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## रुग्ण सेवेचा वसा अविरतपणे सुरु ठेवणार : प्रतापराव पाटील

### वडिलांचा वारसा जपणार, जिपीएस मित्र परिवाराच्या नेत्र शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

पाळधी येथे जिपीएस मित्र परिवाराच्या वतीने आयोजित भव्य नेत्र तपासणी व मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. या शिबिरात तब्बल 810 रुग्णांनी नोंदणी करून नेत्र तपासणीचा लाभ घेतला, तर 330 रुग्णांची मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. या शिबिराचे आयोजन मा. ना. गुलाबराव पाटील यांच्या प्रेरणेतून तसेच जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील व विक्रम पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून करण्यात आले होते. शिबिराला गुलाबराव पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देत रुग्णांची आस्थेने विचारपूस केली व उपक्रमाचे कौतुक केले.

**गावागावातून नागरिकांची मोठी गर्दी**

सकाळी ७ वाजल्यापासूनच परिसरातील विविध गावांमधून आबालवृद्ध नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. नेत्र तपासणीसाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. रुग्णांची तपासणी करून आवश्यकतेनुसार त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. 330 रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेची संधी तपासणीनंतर 330 रुग्णांना शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात



आले. या सर्व रुग्णांची शस्त्रक्रिया आणि पुढील उपचार पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत.

**मोफत सेवा; नाश्ता-जेवणाचीही व्यवस्था**

शिबिरातील सर्व सेवा पूर्णपणे नि:शुल्क देण्यात आल्या. रुग्णांसाठी नाश्ता व जेवणाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या 'दृष्टीदान' उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना नवसंजीवनी मिळाली असून लाभार्थ्यांनी आयोजकांचे मनापासून आभार मानले.

**वैद्यकीय पथकाचा मोलाचा सहभाग**

या शिबिरासाठी डॉ. राहुल चौधरी यांच्या मार्गदर्शनाखालील शंकरा हॉस्पिटलची टीम, डॉ. विजय ब्राम्हणे, डॉ. गुरप्रीत राठोड, अश्विनी महाले, भूपेंद्र वाघ, प्राजक्ता गायकवाड, डॉ. आकाश इयनोर, सोनाली पंथरे, सागर पाटील यांसह अनेक वैद्यकीय तज्ज्ञांनी सेवा दिली. तसेच पाळधी प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय चव्हाण, डॉ. ऋषिकेश झंवर, डॉ. सायमा, डॉ. निलोफर, डॉ. रितुल पाटील, आरोग्य सेवक व आशा कार्यकर्त्यांनीही मोठे योगदान दिले.

**सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक**

या शिबिरासाठी डॉ राहुल चौधरी शंकरा हॉस्पिटलची संपूर्ण टीम डॉ विजय ब्राम्हणे,डॉ गुरप्रित राठोड अश्विनी महाले भुपेंद्र वाघ प्राजक्ता गायकवाड डॉआकाश इयनोर प्राजक्ता गायकवाड सोनाली पंथरे सागर पाटील,पाळधी आरोग्य केंद्राचे कर्मचारी, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय चव्हाण, डॉ. ऋषिकेश झंवर डॉ सायमा,डॉ निळोफर डॉ रितुल पाटील डॉ सायमा खान आरोग्य सेवक अतुल नंनवरे अनिल महाजन गतप्रवर्तक संगीता पाटील व सर्व आशा सेविका तसेच जिपीएस मित्र परिवार, शिवसेना व युवासेना कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. जिपीएस मित्र परिवार, शिवसेना व युवासेना कार्यकर्त्यांनी परिश्रमपूर्वक शिबिर यशस्वी केले. या सामाजिक उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

» Selected

## विकासनिधी वाटपात ठाकरेंच्या सेनेची बोळवण

मुंबई : विकासनिधीच्या वाटपात सत्ताधारी पक्षाला झुकते माप देण्याची प्रथा यंदा महायुतीने कायम ठेवली आहे. भाजप आणि शिवसेना (शिंदे) पक्षाच्या नगरसेवकांना किमान दोन कोटी ते २० कोटींपर्यंतचा विकासनिधी देण्यात आला आहे. शिवसेना (ठाकरे) आणि कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकांना अवघा २५ लाखांचा विकास निधी देऊन त्यांची अक्षरशः बोळवण केली आहे. या एवढ्याशा निधीतून प्रभागात विकासाची कामे कशी करायची असा प्रश्न या नगरसेवकांना पडला आहे. मुंबई महापालिकेचा सन २०२६-२७ चा तब्बल ८०,९५२ कोटींच्या अर्थसंकल्पाला सोमवारी स्थायी समितीने मंजूरी दिली तेव्हा स्थायी समितीला ८०० कोटींचा विकास निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.

## प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे: राज्यपाल

मुंबई : देशात दरवर्षी ३४ लाख टन प्लास्टिक कचरा तयार होत असून यापैकी ४० टक्के प्लास्टिक हे नदी, नाले आणि भूगर्भात जात आहेत. यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असून नदी आणि समुद्र प्रदूषित होत असल्याने मत्यव्यवसाय, पर्यटन व्यवसायासह मानवी आरोग्यालाही धोका निर्माण होत आहे. यामुळे प्लास्टिकला पर्याय शोधण्याची गरज असून प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी गुरुवारी केले

## ३४ हजार कलावंतांना यंदा शासनाचा 'मदतीचा हात



जन सम्राट टाईम्स

**मुंबई** :राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बळ कलावंतांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सरकारच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत यंदा कमालीची भर पडली आहे. वर्षभरात ३४ हजार कलावंतांना दरमहा पाच हजार रुपये प्रमाणे मदतीचा हात देण्यात आला आहे. विविध कलाकारांची मोठी परंपरा असलेल्या राज्यातील संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला आणि नृत्य क्षेत्रातील कलाकारांना ही मदत दिली जाते. सरकारने यंदा या मदतीवर सुमारे २०४ कोटी खर्च केले. राज्यातील जेष्ठ आणि आर्थिक दृष्टया दुर्बळ साहित्यिक व कलाकरांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्याची योजना (१९५५) जुनी आहे. साहित्यिक व कलाकरांच्या अ, ब, क, ड श्रेणीनुसार ही मदत दिली जात होती. त्यावेळी आर्थिक मदत घेणारे कलाकार अतिशय कमी (६०) होते. आर्थिक अडचणीमुळे अनेक कलाकर हालाखीचे दिवस काढत असल्याचे आढळून आले होते. शासनाने २०२४ मध्ये या योजनेत सुधारणा केली. कलाकारांसाठी निश्चित करण्यात आलेली श्रेणी रद्द करण्यात आली. सरसकट सर्वच पात्र कलाकारांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरमहा आर्थिक मदतीची रक्कम पाच हजार रुपये केली. श्रेणी रद्द केल्याने तसेच रक्कम वाढवली गेल्याने मदत घेणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.संगीत, नाटक, लोककला, चित्रकला आणि शिल्पकला या कला क्षेत्रातील कमीत कमी १५ ते २० वर्षाचा अनुभव असलेल्या कलाकाराला ही आर्थिक मदत दिली जाते. त्यासाठी या कलाकराची आर्थिक स्थिती दुर्बळ आणि ५० वर्षाची अट हे दोन प्रमुख निकष आहेत. उत्पन्नाचे दुसरे साधन नसलेल्या कलाकरांना हा लाभ दिला जातो.राज्यातील जिल्हा पातळीवर या कलाकरांच्या अर्जाची छाननी केली जाते. आर्थिक मदतीची रक्कम वाढल्यानंतर गेल्या दोन वर्षात लाभ घेणाऱ्या कलाकारांची संख्या वाढली आहे. ती आता ३४ हजाराच्या घरात गेली आहे. प्रत्येक जिल्हानिहाय १०० कलाकरांचे अर्ज मागवण्यात आलेले आहेत. या मदतीसाठी सरकारने या वर्षी २२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याशिवाय शासनाने जिल्ह्यातील जेष्ठ कलाकारांसाठी १०० अर्जांची मर्यादा ठेवली आहे. राज्यातील कानाकोपऱ्यातून या मदतीसाठी अर्ज येत असतात. काही कलाकारांचे निधन होत असल्याने ही संख्या कमी होते पण नवीन येणारे अर्जांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचे एका उच्च अधिकाऱ्याने सांगितले.

# शिंदेंच्या शिलेदाराच्या अडचणी वाढल्या?

## न्यायालयाकडून ईव्हीएम तपासणीचे आदेश

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** : भारताच्या निवडणूक इतिहासात प्रथमच ईव्हीएम (ELECTRONIC VOTING MACHINE) तपासणीसाठी न्यायालयीन परवानगी मिळाल्याने मोठी घडामोड घडली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या या ऐतिहासिक आदेशामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत नवा अध्याय सुरू झाल्याचे मानले जात आहे. न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांनी दिलेल्या आदेशानुसार, २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील चांदिवली मतदारसंघातील ईव्हीएम यंत्रांची तपासणी करण्यास परवानगी देण्यात आली आहे. या प्रकरणात कॉंग्रेस कार्यसमितीचे सदस्य आणि माजी मंत्री नसीम खान हे याचिकाकर्ते असून, शिवसेना (शिंदे गट)चे उमेदवार दिलीप लांडे हे प्रतिवादी आहेत. चांदिवली मतदारसंघात झालेल्या निवडणुकीत दिलीप लांडे यांनी नसीम खान यांचा पराभव केला होता. या निकालावर प्रश्नचिन्हे उपस्थित करत नसीम खान यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनी ईव्हीएमच्या कार्यप्रणालीबाबत शंका व्यक्त करत तपासणीची मागणी केली होती. या आदेशावर प्रतिक्रिया देताना नसीम खान यांनी हा निर्णय "ऐतिहासिक" असल्याचे म्हटले.




### निवडणूक प्रक्रियेत अधिक पारदर्शकता

कॉंग्रेस पक्षाने यापूर्वीच आपल्या उमेदवारांना संबंधित मतदारसंघांमध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. 'INDIA' आघाडीतील अनेक उमेदवारांनीही ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबाबत चिंता व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, भविष्यात निवडणूक प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि विश्वासार्हता निर्माण होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

"निवडणुका झाल्यानंतर उमेदवार आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ईव्हीएमची तपासणी होणे, हे भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच घडत आहे," असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या एप्रिल २०२४ मधील निकालाचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील किमान ५ टक्के ईव्हीएममधील कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट आणि व्हीव्हीपॅट (VVPAT) यंत्रांची 'बर्न्ट मेमरी' तपासण्याची प्रक्रिया राबवली जाऊ शकते. ही तपासणी ईव्हीएम उत्पादक कंपन्यांच्या अभियंत्यांमार्फत केली जाणार आहे. मुंबई उपनगर जिल्ह्याच्या उप-निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ईव्हीएम उत्पादक कंपनी 'भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड' (BEL), बंगळुरू यांच्या तज्ज्ञांमार्फत १६ आणि १७ एप्रिल रोजी मुंबईत 'डायग्नोस्टिक चेक' करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया संबंधित उमेदवार आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

# 'काम नाही तर पद नाही': शिंदे

## पक्ष संघटनेत बदल करण्याचे संकेत

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** : शिवसेना शिंदे पक्षात महत्वाची पदे घेऊन मिरवण्यात धन्यता मानणारे काही पदाधिकारी एकनाथ शिंदे यांच्या रडारवर आले आहेत. मंत्रीमंडळातील पक्षाच्या काही मंत्र्यांविषयी गंभीर तक्रारी आहेत. पक्ष वाढीसाठी मेहनत न घेणाऱ्या काही पदाधिकाऱ्यांना नारळ देण्याचा शिंदे यांचा विचार आहे. त्यासाठी 'काम नाही तर पद नाही' असा कारवाईपूर्वीचा इशारा शिंदे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांच्या ऑनलाईन बैठकीत दिला आहे. राज्यातील सर्व निवडणूका पार पडलेल्या आहेत. तीन वर्षानंतर लोकसभा निवडणूक होणार आहे. त्याच्या तयारीला शिवसेना शिंदे पक्ष लागला आहे. शिंदे पूत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पक्षाची धुरा सांभाळण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्यावर ठाण्याबरोबर मुंबईची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शिवसेना फूटीनंतर ठाकरे पक्षातून आलेल्या प्रत्येक आमदार, खासदार व सक्रीय कार्यकर्त्याला पदे मिळाली आहेत. राज्यात सत्ता आल्याने अनेकांच्या गळ्यात मंत्रीपदाची माळ पडली. पद, पैसा मिळल्यानंतरही काही पदाधिकारी केवळ मिरवण्याचे काम करीत असल्याच्या तक्रारी शिंदे यांच्याकडे आलेल्या आहेत.



अनेक मंत्र्याबद्दल गंभीर तक्रारी असून पक्ष बदनाम होत आहे असा निकर्ष काढण्यात आला आहे. भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात शिंदे यांना विरोधकांनी लक्ष केले. त्यावेळी पक्षाची बाजू मांडण्यात नेते व प्रवक्ते कमी पडले असा सूर लावला जात आहे.

### मंत्रीपदाची माळ

राज्यातील सर्व निवडणूका पार पडलेल्या आहेत. तीन वर्षानंतर लोकसभा निवडणूक होणार आहे. त्याच्या तयारीला शिवसेना शिंदे पक्ष लागला आहे. शिंदे पूत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पक्षाची धुरा सांभाळण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्यावर ठाण्याबरोबर मुंबईची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शिवसेना फूटीनंतर ठाकरे पक्षातून आलेल्या प्रत्येक आमदार, खासदार व सक्रीय कार्यकर्त्याला पदे मिळाली आहेत. राज्यात सत्ता आल्याने अनेकांच्या गळ्यात मंत्रीपदाची माळ पडली.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# विद्यार्थिनीवरील अत्याचार प्रकरणी शिक्षकाला चोप!

## तीन वर्षे सुरू असलेल्या शोषणाचा पर्दाफाश



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव** : धरणगाव शहरात गुरु-शिष्य नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका शिक्षकाने आपल्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर गेल्या तीन वर्षांपासून लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप समोर आल्यानंतर परिसरात संतापाची लाट उसळली आहे. संतप्त नातेवाईकांनी संबंधित शिक्षकाला भररस्त्यात पकडून चोप दिल्याची घटना घडली असून, त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे. माहितीनुसार, आरोपी शिक्षकाने पीडित मुलीला धमकावत, भीती दाखवत तिचे दीर्घकाळ शोषण केले. या भीतीमुळे मुलगी इतके दिवस गप्प राहिली होती. मात्र, अखेर तिने धाडस करून हा प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितला. त्यानंतर संतप्त नातेवाईकांनी आरोपीला शोधून काढत सार्वजनिक ठिकाणी त्याला मारहाण केली. घटनेचा व्हिडिओ काही नागरिकांनी मोबाईलमध्ये चित्रीत केला असून तो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. यामुळे नागरिकांमध्ये संताप अधिकच वाढला असून आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे. दरम्यान, पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. आरोपी शिक्षकाला ताब्यात घेऊन त्याच्याविरोधात अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. पोलिस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या घटनांमध्ये कायदा हातात घेऊ नये. तसेच पीडितेची ओळख उघड होईल, असे कोणतेही फोटो किंवा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करू नयेत. या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात चिंता व्यक्त होत असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत अधिक दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर दिवा शहरात शांतता समिती बैठक संपन्न

## पोलीस प्रशासनाचे आवाहन; शिस्तबद्ध व शांततेत जयंती साजरी करण्यावर भर

जन सम्राट टाईम्स

दिवा : येत्या १४ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दिवा शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मुंब्रा पोलीस प्रशासनाच्या वतीने विशेष शांतता समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत शहरातील विविध जयंती उत्सव मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंब्रा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमोल कोळेकर आणि अनिल सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत उत्सवाचे नियोजन, संभाव्य अडचणी आणि सुरक्षेच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

उत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि नागरिकांनी आनंदात, पण शिस्तीत जयंती साजरी करावी, यावर पोलीस प्रशासनाने विशेष भर दिला. बैठकीदरम्यान विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या सूचना



मांडल्या. मिरवणुकीचे मार्ग, वाहतूक व्यवस्थापन, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, तसेच सुरक्षेसंबंधी काही मुद्दे पोलीस प्रशासनासमोर मांडण्यात आले. यावर पोलीस निरीक्षक अमोल कोळेकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व समस्या समजून घेतल्या आणि आवश्यक त्या सूचना दिल्या. "महामानवाची जयंती शांततेत आणि सामाजिक सलोखा राखून साजरी करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करत प्रशासनाला सहकार्य करावे," असे आवाहन यावेळी पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले. या बैठकीला नगरसेवक दीपक जाधव, समाजसेवक अमोल केंद्रे, दिनेश पाटील, सोपान जाधव, सुवर्णा कांबळे, उद्योजक बालाजी कदम यांच्यासह विविध सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच दिवा शहरातील अनेक जयंती मंडळांचे प्रतिनिधी आणि नागरिकांनीही सक्रिय सहभाग नोंदवला. बैठकीच्या शेवटी सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यंदाची आंबेडकर जयंती दिवा शहरात अत्यंत उत्साहपूर्ण, पण शिस्तबद्ध आणि शांततेत साजरी करण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.

## वीज वितरणाचे क्षेत्र खासगी कंपन्यांना खुले करण्याचा डाव

जन सम्राट टाईम्स

मुंबई : कृषीपंपधारक वगळता औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती क्षेत्राकरिता वीज वितरण करणाऱ्या महावितरण कंपनीला भांडवली बाजारात सूचिबद्ध करण्याचा राज्य सरकारचा निर्णय म्हणजे वीज वितरणाचे क्षेत्र मागील दाराने खासगी कंपन्यांना खुले करण्याचा डाव असल्याचा आरोप वीज कर्मचारी संघटनेकडून केला जात आहे. ७६ हजार कोटीहून अधिक वीज बिल थकबाकी असलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडचे (महावितरण) विभाजन करून कृषिपंप ग्राहकांकरिता स्वतंत्र एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) ही कंपनी स्थापन करण्याच्या निर्णयाला नुकताच मंत्रिमंडळ बैठकीत हिरवा कंदिल दाखविण्यात आला. यामुळे कृषिपंप वापरकर्ते म्हणजे शेतकरी वगळता उर्वरित औद्योगिक, वाणिज्यिक, वीज ग्राहकांनाच महावितरणच्या माध्यमातून सेवा दिली जाईल. ही स्वतंत्र महावितरण कंपनी भांडवली बाजारात सूचिबद्ध करण्याकरिता प्रारंभिक समभाग विक्री (आयपीओ) काढण्यास मान्यता देण्यात आली आहे. आयपीओच्या माध्यमातून १० हजार कोटी उभारण्याची योजना आहे. यातून महावितरणला विस्तारासाठी भांडवल उपलब्ध होईल.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न; आरोपीला तात्काळ अटक करा – सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी

## पिंपळगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल; पीडित कुटुंबाला संरक्षणाची मागणी

जन सम्राट टाईम्स

पाचोरा (जळगाव) : तालुक्यातील लाख तांडा येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते आनंदभाऊ खरे यांनी आरोपीला तात्काळ अटक करून पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 16 मार्च 2026 रोजी पीडित मुलगी घरी एकटी असताना आरोपी किशन प्रकाश बेलदार याने घरात घुसून तिच्यावर अश्लील हावभाव करत जबरदस्तीने अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र पीडितेने आरडाओरड केल्यामुळे आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या घटनेनंतर 17 मार्च रोजी पिंपळगाव पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (POCSO) कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तरीदेखील आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. सामाजिक कार्यकर्ते आनंदभाऊ खरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आरोपीची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची असून त्याला राजकीय पाठबळ असल्यामुळे स्थानिक पोलीस प्रशासन कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप आहे. सध्या पीडित कुटुंब भीतीच्या छायेखाली जीवन जगत असून त्यांना तातडीने पोलीस संरक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे खरे यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच, आरोपीला त्वरित अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या संदर्भात उपविभागीय अधिकारी, वसमत यांच्या मार्फत राज्याचे गृहमंत्री यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले असून, प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# अभिमानास्पद दंतसेवा; डॉ. अंगद भद्रे यांची उल्लेखनीय कामगिरी

## माफक दरात उपचार देत समाजसेवेचा आदर्श; पुण्यातील नागरिकांचा वाढता विश्वास

जन सम्राट टाईम्स

**पुणे**: मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील शिरूर गावचे सुपुत्र डॉ. अंगद शिवाजी भद्रे यांनी पुण्यात आपल्या दंतचिकित्सा सेवेतून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. देहू-आळंदी परिसरातील पाटीलनगर कॉर्नर, श्रीक्षेत्र टाळगाव चिखली येथे सुरू असलेले 'डॉ. भद्रे डेंटल क्लिनिक' गेल्या दोन वर्षांपासून नागरिकांच्या विश्वासाचे केंद्र बनले आहे. संघर्षातून पुढे आलेल्या डॉ. भद्रे यांनी दंतचिकित्सा हा



केवळ व्यवसाय म्हणून न पाहता समाजसेवेची भूमिका स्वीकारली आहे. विशेषतः गोरगरीब व कष्टकरी रुग्णांना अत्यंत माफक दरात तपासणी व उपचार देऊन त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आजच्या वाढत्या महागाईच्या काळात सर्वसामान्यांना परवडणारी आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे मोठे आव्हान असताना, डॉ. भद्रे यांनी ते यशस्वीपणे पेलले आहे. त्यांच्या सेवेमुळे अनेक रुग्णांना दिलासा मिळत असून परिसरातील नागरिक त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करत आहेत. याच पार्श्वभूमीवर डॉ. भद्रे यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. या भेटीदरम्यान त्यांच्या कार्याचे कौतुक करत समाजोपयोगी उपक्रमांना पुढे नेण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सुनिताताई दत्ता सोनकांबळे बेटमोगरेकर, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक संघशिल भद्रे (एस. एन. नांदेडकर) तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

### दंतसेवेचा लाभ घेण्याचे आवाहन

पुणेकर तसेच देहू-आळंदी परिसरातील नागरिकांनी दर्जेदार आणि परवडणाऱ्या दंतसेवेचा लाभ घेण्यासाठी 'डॉ. भद्रे डेंटल क्लिनिक'ला भेट द्यावी, असे आवाहन क्लिनिकच्या वतीने करण्यात आले आहे.

# आंबेडकर जयंतीनिमित्त 'ड्राय डे'ची मागणी

## शांततेसाठी मद्यविक्री बंद ठेवण्याचे निवेदन

जन सम्राट टाईम्स

पाचोरा : पाचोरा शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी 'ड्राय डे' घोषित करून शहरातील तसेच गाव, तांडा आणि वस्त्यांमधील सर्व मद्य, दारू व वाईन शॉपची दुकाने पूर्णपणे बंद ठेवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात राष्ट्रीय भीमसेनीच्या वतीने पाचोरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरी केली जाते. शहरासह ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर मिरवणुका,



सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. अशा वेळी मद्यविक्रीमुळे अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी १४ एप्रिल रोजी संपूर्ण परिसरात मद्यविक्रीवर बंदी घालण्यात यावी. तसेच, जयंती उत्सव शांततापूर्ण, आनंददायी आणि सामाजिक सलोखा राखणाऱ्या वातावरणात पार पडावा, यासाठी प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करावी, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. 'ड्राय डे' जाहीर केल्यास नागरिकांना जयंती साजरी करताना कोणताही अडथळा येणार नाही, तसेच शहरातील शांतता आणि सुव्यवस्था कायम राखण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय भीमसेनीचे जिल्हाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. या प्रसंगी माजी नगरसेवक खंडू सोनवणे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रवि वाघ, सुपडू जाधव, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष संदीप जाधव, मिलिंद खैरनार, संजय खैरनार, भीमराव जाधव, दीपक जाधव आदी उपस्थित होते. दरम्यान, पोलीस प्रशासनाने निवेदन स्वीकारून याबाबत सकारात्मक भूमिका घेत योग्य निर्णय घेण्याचे संकेत दिल्याची माहिती समोर आली आहे.